

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved
Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**

On the Occasion of One Day National Conference On

## WOMEN EMPOWERMENT CHALLENGES AND SOLUTIONS

27th January, 2018

**(Book IV)**



*Editor*
**Mr. Eshwar L. Rathod**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY
DEPARTMENT OF SOCIOLOGY
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | लिंगभाव, विकास आणि महिलांचे योगदान | प्रा. श्रीमती के. व्ही. काकडे | 06 |
| 2. | महिला चळवळीची सामाजिक आणि राजकीय वाटचाल | प्रा. मनिषा किर्तन | 08 |
| 3. | स्त्री विकासात महिला चळवळीचे योगदान | डॉ. किशोर उत्तमराव राऊत | 10 |
| 4. | महिला सबलीकरणासाठी सुरक्षित कायदे आणि उपाय | प्रा. कुकडे सुनिता जगन्नाथराव<br>डॉ. भिसे आर.एम. | 13 |
| 5. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया: एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. आलटे शशिकांत मुकुंदराव | 16 |
| 6. | 21 व्या शतकातील आधुनिक स्त्रियांचे प्रश्न...! | प्रा. डॉ. संदीप रामराव गोरे | 19 |
| 7. | कौटुंबिक हिसाचार आणि स्त्रिया एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ.मरके दिलीप सिताराम | 22 |
| 8. | महिला सबलीकरणा करता कौटुंबीक हिंसा आणि प्रतिबंधक.... | प्रा. डॉ. अनुराधा खाडे | 24 |
| 9. | **कौटुंबिक हिंसाचार ही एक ज्वलंत समस्या** | **डॉ. बी. डी. पवार** | 26 |
| 10. | महिला सबलीकरणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान... | डॉ. प्रतिभा अहिरे | 29 |
| 11. | हुंडा समस्येचा जातीव्यवस्था आणि धर्माशी असलेला संबंध आणि ... | प्रा. डॉ. गोरे बी.एम | 33 |
| 12. | स्त्रीवादी अभ्यास विकास आणि स्त्रीया | श्रीमती जाधव एस. टी. | 35 |
| 13. | शेती अर्थव्यवस्था आणि स्त्रिया | रशिदा बेगम शेख रहेमतुल्ला | 37 |
| 14. | स्त्रीवादी अभ्यास, विकास आणि स्त्रिया | डॉ. अण्णाराव रामराव वागडव | 39 |
| 15. | भारतीय समाजव्यवस्था आणि स्त्रिया | प्रा. डॉ. असिया चिश्ती | 42 |
| 16. | जागतिकीकरणाचा भारतीय समाजातील स्त्रियांवर झालेला परिणाम ... | प्रा.डॉ.चंद्रशेखर एस.पाटील | 46 |
| 17. | हुंडा पध्दती महिला मानवाधिकारांचे उल्लंघन | डॉ. एन. बी. कदम | 49 |
| 18. | स्त्री-पुरुष असमानता : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. दामावले डी.एन. | 52 |
| 19. | शेती अर्थव्यवस्था आणि स्त्रिया विशेष संदर्भ बीड जिल्हा | डॉ. यादव घोडके | 55 |
| 20. | प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया | डॉ. विठ्ठल भिमराव मातकर | 59 |
| 21. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया - | डॉ.जिजाबाई कांगणे | 61 |
| 22. | भारतीय संस्कृति परंपरा और स्त्रियॉं | प्रा. डॉ. कुलकर्णी वनिता | 63 |
| 23. | मराठी कवयित्रींचे काव्य आणि महिला सबलीकरण | प्रा. डॉ. हनुमंत माने | 66 |
| 24. | ~~महिला सुरक्षेत महिला आयोगाची भुमीका~~ कौटुंबीक हिंसाचार आणि महिला | डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे | 69 |
| 25. | कौटुंबीक हिंसाचार आणि स्त्रिया | डॉ. मुंडे बाळासाहेब विश्वनाथ | 72 |
| 26. | स्त्रियांच्या मानवी हक्कांबाबतची चळवळी | प्रा. सुषमा अर्जुन जाधव | 74 |
| 27. | शेती अर्थव्यवस्था आणि स्त्रियांचा सहभाग | प्रा. पल्लवी इरलापल्ले | 77 |
| 28. | कौटुंबिक हिंसाचार स्त्रिया व प्रतिबंधात्मक कायदा | बोकडे भगवंत चंद्रकांत | 80 |
| 29. | जागतिकीकरण आणि स्त्रिया | प्रा. डॉ. गायके एस.के | 81 |
| 30. | महिला सबलीकरण आणि महिला विषयक कायदे | प्रा. ईश्वर राठोड | 84 |
| 31. | कौटुंबिक अत्याचार : एक सामाजिक चिंतन | प्रा. नागोराव संभाजी भुरके | 86 |
| 32. | भारतातील स्त्री भ्रुण हत्या एक अभ्यास | प्रा. भोसले ए.आर. | 88 |
| 33. | उद्योग - स्त्री सबलीकरण | प्रा. सागर लोकनाथ बडगे | 90 |
| 34. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रीया | प्रा. उगीले माधव उत्तमराव | 93 |
| 35. | हुंडा -प्रथा, समाज आणि स्त्रिया | डॉ. मिसाळ हनुमंत | 95 |
| 36. | महिलांच्या सामाजिक चळवळी | डॉ. आनंदा भिकुजी काळे | 100 |
| 37. | हुंडाप्रथा: एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. विद्या खंडारे -गोवंदे | 102 |
| 38. | महिला सबलीकरण : आव्हाने व उपाय | प्रा.तुकाराम कोल्हे | 104 |
| 39. | लिंगभाव विषमता आणि पारधी स्त्री | प्रा. नंदकिशोर उकंडराव राऊत | 106 |
| 40. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रीया | प्रा.डॉ. विठ्ठल कांबळे | 109 |
| 41. | कौटुंबीक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. तांदळे सुरेंद्र सुंदरराव | 111 |
| 42. | 19 व्या शतकातील साहित्य क्षेत्रातील स्त्रीयांचे प्रतिबिंब | प्रा.स्निग्धा आर. कांबळे | 113 |


Late Ramesh Warpudkar College, Sonpeth Dist. Parbhani

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

24.

# ~~महिला सुरक्षेत महिला आयोगाची भूमीका~~ कौटूंबीक स्त्रियांवर अत्याचार

डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे
समाजशास्त्र विभागप्रमुख
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ ता. सोनपेठ जि.परभणी मो.९९२३७७६०७७

**प्रस्तावना :**

मानव हा समाजशील प्राणी आहे म्हणूनच मानवी जीवनात कुटूंबास अनन्यसाधारण महत्व आहे. कुटूंबातच व्यक्तीचे संगोपण, पालनपोषण, संरक्षण आणि सर्वांगिण विकास होत असतो. स्त्रियांचा दृष्टीने कुटूंबव्यवस्थेचे अधिकच महत्व आहे. आज भारतीय कुटूंबात आज घरोघरी असंख्यदेवीची देवघरात पुजा केली जाते त्या निमीत्त वेगवेगळे धार्मिक कार्यक्रमही मोठ्या आनंदाने आयोजीतही केले जातात. पण व्यवहारात मात्र अशा असंख्य पाशवी व्यक्ती स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करून तिची कुचंबना, अवहेलना करून समानतेच्या अधिकाराची गळचेपी करत असतात. अलिकडच्या काळात तर कुटूंब व्यवस्थेत म्हणजेच स्वतःच्याच घरामध्ये तिच्यावर होणाऱ्या शारिरीक व मानसीक अत्याचाराची तीव्रता थरकाप उडविणारी आहे. समाजातील सर्वच स्तरातील, वर्गातील, जातीतील, धर्मातील, स्त्रियांना आज कुटूंबातील निकटवर्तीयकडून होणाऱ्या छळाला सामोरे जावे लागत आहे. गर्भजळ परिक्षेचा गैरवापर करून स्त्रीलिंगी गर्भ असल्यास त्याचा गर्भपात करून स्त्रीला जन्माला येवू न देण्यापासून तिच्यावर कुटूंबातील व्यक्ती अत्याचार सुरु करतात. आणि ती जन्माला आलीच तर आयुष्यातील विविध टप्यांवर भ्रुणहत्येपासुन ते तो वृध होईपर्यंत तिच्यावर अत्याचार होतच राहतात. तसेच स्त्रियांवर आपला मालकी हक्क आहे म्हणून चारचौघात मारहान करणारे पतिपरमेश्वरही काही कमी नाहीत. तसेच समाजात बदनामी होवून किंवा कायद्याच्या भितीपोटी बायकोला शारिरीक मारहान न करणारे परंतु तिच्यावर रोज मानसिक अत्याचार करतात केवळ पत्नीलाच अशी वागणुक दिली जाते. असे नाही तर स्वतःच्या पोटच्या मुलीला, बहिणीला, आईलाही अत्यंत हीन वागणूक देणाऱ्या पुरुषांचीही संख्या काही कमी नाही.

**शोधनिबंधाचा उद्येश :**

- कैटूंबीक हिसांचाराचे अर्थ व स्वरुप जाणून घेणे.
- कैटूंबीक हिसांचाराची प्रमुख कारणे स्पष्ट करणे.
- कैटूंबीक हिसांचाराचे स्त्रिजिवनावरील परिणाम विशद करणे.
- कैटूंबीक हिसांचार प्रतिबंधासाठी समाजाची व प्रशासनाची कोणती भूमिका असावी हे स्पष्ट करणे.

**अध्ययन पध्दती :**

सदरील शोधनिबंधासाठी व्दितीयक स्त्रोताव्दारे व निरीक्षण पध्दतीचा आवलंब करुन उपयुक्त माहिती संदर्भग्रंथ, मासिक, वृत्तपत्रे इंटरनेट याव्दारे संकलीत करुन त्याची समाजशास्त्रीय द्रष्टीकोणातुन मांडणी करण्यात आली आहे.

**गृहितक :**

स्त्रियांवर वरील हिसांचारास पुरुषसत्तक समाजव्यवस्था, पुरुषी मानसिकता व स्त्रियांचा सोशीकपणा जबाबदार आहे.

कैटूंबिक हिसांचार हो स्त्री प्रश्नांच्या बाबतीत अलिकडे वापरात आलेली व्यापक संकल्पना आहे. स्त्रियांवर होणाऱ्या घरगुती अत्याचारा बाबतची गुंतागुंत समजून घेण्याच्या उद्येशाने कैटूंबीक हिसांचारचा अर्थ स्पष्ट करणे आवश्यक आहे. 'कुटूंबातील महिलेला कुटूंबातील निकटवर्ती कडून होणारा शारिरीक, मानसिक, आर्थिक, लैंगिक, छळ म्हणजे कैटुंबिक हिसांचा होय'. 'कुटूंबातील महिलेस घरात राहाणे अवघड होईल. शारिरीक व मानसीक त्रास होईल असे पतीने वा कुंटूंबातील कोणत्याही व्यक्तीने केलेले वर्तन कृती म्हणजे कौटूंबीक हिसांचार होय.'

कैटूंबिक हिसांचार प्रतिबंधक कायदा २००५ नुसार " व्यथित स्त्रिच्या शारिरीक किंवा मानसिक आरोग्यास सुरक्षिततेस, एकुण जिवितास, कल्याणास धोकादायक परिस्थितीत नेणारे वातावरण तसेच व्यथित स्त्रिच्या जीवनास किंवा कोणत्याही अवयवास घातक आणि उपद्रवी ठरेल अशी वागणूक, व्यथित स्त्रिया लैंगिक छळ, लैंगिक दुरुपयोग, शाब्दीक किंवा भावनिक छळ, आर्थिक छळ. आर्थिक फायदयापासून वंचीत ठेवणे तसेच आर्थिक कारणासाठी दुरुपयोग होत असेल तर तो कौटुंबीक हिसांचार समजला जातो."

कैटूंबिक हिसांचार म्हणजे अशा सर्व कृती ज्या स्त्रिच्या मानसिक किंवा शारिरीक आरोग्यास, सुरक्षिततेस, जिवीतास, कल्याणास उपायकारक आहेत तसेच बेकायदेशिर गोष्टींची मागणी पुर्ण करण्यासाठी छळ, शारिरीक अन्याय, शाब्दीक वा भावनिक अन्याय लैंगिक अन्याय आणि आर्थिक अन्याय होणाऱ्या वृतींचा समावेश होतो.

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

**१) कैटुंबीक हिसांचाराचे स्वरुप :**

कैटुंबीक हिसाचाराच अर्थ समजून घेण्यासाठी स्त्रीयांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या हिंसा जाणून घेणे महत्वाचे आहे. आजही स्त्रियांना कुटुंबातील निकटवर्तीया कडून विविध प्रकारच्या हिंसेला सामोरे जावे लागते त्यातील बऱ्याच हिंसेचे प्रकार स्त्रियांना गंभीर वाटत नाहीत पण यांचा स्त्रियांच्या शारिरीक मानसिक स्थितीवर गंभिर परिणाम होतो. कौटुंबिक स्त्रियांवर होणाऱ्या हिसेचे स्वरुप पाहातांना प्रामुख्याने शारिरीक छळ करणे, स्त्रियांवर जीव घेणे वार करणे, पिडीतेस गोष्टीपासुन वंचीत ठेवणे, मानसिक छळ करणे. भावनिक कोंडमारा करणे, पिडीतेस नियंत्रणात ठेवणे, पिडीतेस धमक्या देणे, पिडीत महिलेत अपराधीपणाची भावना निर्माण करुन देणे, फसवणूक करणे, आर्थिक छळ करणे, लैंगिक छळ करणे. अशा विविध स्वरुपाच्या हिसांचारास महिला बळी पडत आहेत.

कौटुंबीक हिसांचार हा फक्त गरिब घरांमधला प्रश्न नाही तर आर्थिक दृष्ट्या सुस्थितीतल्या कुटुंबामध्ये देखील स्त्रियांवर अनेकवेळा तिच्या नातेवाईकांकडून आत्याचार होतो. समाजातील प्रत्येक जाती, धर्म तसेच आर्थिक सामाजिक स्तरातील कुटुंबामध्ये स्त्रियांवर हिसांचार होतो. प्रत्येक घरात काही प्रमाणात कुरबुरी, वाद होतात त्यांना कशाला चव्हाट्यावर आनायचे असे समजले जाते परंतु कुरबुरी होणे, चुका होणे, एकमेकांचे न पटणे अशा अनेक वादातून मार्ग काढता येतो पण तसे न होता, त्याचे पर्यावसान स्त्रियांवरील हिसांचारात होते. हा अन्याय, आत्याचार, छळ बऱ्याचदा अदृश्य असतो म्हणून त्याची फारशी दखल घेतली जात नाही आणि अशा घटना नजरेत आल्या तरी 'घरगुती मानला' म्हणून नजरेआड केल्या जातात. या सर्व गोष्टी लक्षात घेता स्त्रियांवर होणारा घरगुती अन्याय, आत्याचार हिसांचार हा केवळ 'घरगुतीमानला' किंवा व्यक्तिगत स्वरुपाचा गुन्हा राहीला नसून तो एक 'सामाजिक गुन्हा' आहे. स्त्रियांवर वाढत जाणार हिसांचार हा एक गंभीर समस्या बनली आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांवर होणारी हिंसा जन्मापासून ते मृत्युपर्यंत वयाच्या वेगवेगळ्या टप्यांमध्ये होत असते. हिसेचे अनेक प्रकार असे आहेत की त्यांना हिंसा म्हणून समाजात मान्यताच नाही. परंतु या सगळ्या हिंसेचा खोल परिणाम स्त्रियांच्या मनावर , शरिरावर , आरोग्यावर आणि संपूर्ण आयुष्यावर होत असतो. कैटुंबीक हिसांचाराचे विविध प्रकार लक्षात घेता कैटूंबिक हिसांचाराचे पिडीत स्त्रियांच्या आरोग्यवर गंभीर परिणाम होताना दिसून येतात कैटुंबीक हिसांचारामुळे होणाऱ्या जखमा , कापणे हाडे मोडणे, दुखापतीचे स्त्रियांच्या आरोग्यावर खोलवार परिणाम होतात. एवढेच नाहीतर कौटुंबिक हिसांचारामुळे पिडीत स्त्रियांच्या मृत्युचे प्रमाणे देखील धक्कादायक आहे. स्त्रियांवरील कैटुंबीक हिंसा हा वेयक्तीक नाही तर एक गंभीर सामाजिक व जागतिक तसंच सार्वजनीक आरोग्याचा प्रश्न बनला आहे.

**कौटुंबीक हिंसाचाराची कारणे :**

स्त्रियांचे प्रश्न निसर्गदत्त नसून मानवनिर्मित आहे. त्यांची मुळे पुरुषप्रधान समाजरचनेत आहेत. जीवनाच्या सर्व पातळी वर पुरुषांचे वर्चस्व आहे व त्याला सामाजिक मान्यताही आहे. यातुनच स्त्री - पुरुषांचे संबंध हे पुरुष श्रेष्ट व स्त्री कनिष्ट या पध्दतीने संबंध झालेले आहेत त्यामुळेच कैटुंबीक हिसांचारात दिवसेंदिवस वाढत होत आहे. त्याची प्रमुख कारणे म्हणजे प्ररुषप्रधान कुटूंब व्यवस्था, धर्मशास्त्राचे प्राबल्य, आर्थिक दृष्ट्या , आर्थिक दृष्ट्या परावलंबन , आक्रमकतेचा अभाव, पुरुष प्रधान संस्कार, मुलगी मुलगी परक्याचेधन , विकृत मनोवृत्ती , व्यसनाधीन लोभीवृत्ती , चारित्र्याबद्दल संशय, नातेवाईकांचा हस्तक्षेप महिलांची कुरुपता, कायद्याची कुमकुवत अमलबजावणी, समाजाचे अप्रत्यक्ष सहकार्य इ. विविध कारणांमुळे स्त्रियांवरील आत्याचार वाढत जातात.

**भारतातील व महाराष्ट्रातील आकडेवारी :**

- केटुंबीक हिसांचाराला कंटाळुण भारतात दरदिवशी ६६ पिडीत स्त्रिया आत्महत्या करतात.
- कैटुंबिक घटनांमध्ये भारतात दररोज ६५ महिलांचा पाण्यात बुडूण मृत्यु होतो.
- कौटुंबिक हिसांचारामुळे भारतात दररोज ५७ महिला विषरी औषध पिऊन आपली जिवनयात्रा संपवितात किंवा जबरदस्तीने विषारी औषध पाजुन मारले जाते.
- कैटुंबीक हिसांचाराच्या घटनांमध्ये भारतात दररोज ३५ महिलांचा भाजुन मृत्यु होतो. एकतर त्यांना जाळले जाते किंवा पिडीत स्त्री स्वतः जाळून घेते.

महाराष्ट्र शासनाच्या जीवन विषयक आकडेवारी २००१ नुसार कौटुंबिक हिसांचाराशी संबंधीत घटना या स्त्रियांच्या मृत्युचे कारण म्हणून समोर आल्या आहेत.

- महाराष्ट्र ग्रामीण भागातील १५ ते ३४ वर्ष वयोगटातील स्त्रियांच्या मृत्युंच सर्वात प्रमुख कारण आहे भाजणे किंवा भाजुन मृत्यु . एकूण कारणापैकी भाजुन मृत्युचे प्रमाण १२.७७ % आहे. या शिवाय कैटुंबीक हिसांचारामुळे होणाऱ्या आत्महत्येचे प्रमाण ६.८६ % खुनाचे प्रमाण ०.७९ % असून बडून मृत्युचे होणाऱ्या पिडीत महिलांचे प्रमाण ४.९५% इतके आहे. ही सर्व

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

आकडेवारी एकत्र केल्यास स्त्रियांच्या मृत्युच्या एकूण कारणांपैकी २५.३७% मृत्यु हे कौटूंबिक हिंसेशी संबंधीत असल्याचे दिसून येते.

- डॉ. किशोर खिल्लारे यांनी सन २००३ -२००४ या वर्षांतील पिंपरी चिंचवड मधील यशवंतराव चव्हाण हॉस्पीटलच्या अपघात विभागातील गोळा केलेल्या आकडेवारी नुसार ५५.७३% स्त्रियांना कौटूंबीक हिंसेमुळे शारिरीक जखमा झालेल्या होत्या. १३.८५% पडीत स्त्रियांना कौटूंबिक छळामुळे विषबाधा झालेली होती तर १३.४०% पिडीत महिलांना (रस्त्यावरील अपघातांशिवाय) अपघात झालेले होते.

या आकडेवारी वरुन असे स्पष्ट होते की, कैटूंबीक हिसांचाराचे स्त्रियांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात तसेच आजार पणाच्या कारणांमध्ये कैटूंबिक हिंसा हे एक प्रमुख कारण असून त्यामुळे होणाऱ्या मृत्युचे प्रमाण देखील चिंताजनक आहे म्हणूनच स्त्रियांवर होणारा कौटूंबिक हिसांचार हा देखील सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न बनला आहे.

**संदर्भ :**

१) डॉ. महाजन रघुनाथ, डॉ. देसाई संभाजी, कौटूंबीक हिसांचार आणि महिला , प्रशांत प्रकाशन जळगाव जून २०१६, पान नं. १३, २९, ३०
२) प्रा. गोरे आशोक , भारतीय सामाजिक समस्या , विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद जून २०१५, पान नं. ३७६, ३७७,
३) डॉ. पैठणे, डॉ. जावळे, प्रा. कोल्हे , भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या , प्रशांत पब्लिकेशन जळगाव, जुलै २०१४ पान नं. ६२
४) डॉ. मनवर डॉ. एम. भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या अरुणा, प्रकाशन , नोव्हे २००३, पान नं. १२८,१२९.
५) संपादक प्राचार्य भारंबे ,डॉ. जावळे, प्रा. कोल्हे, स्त्रिभ्रहणत्या आणि स्त्रियांवरील वाढते आत्याचार, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव मार्च २०१५, पान नं. २४७

❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani